प्रकरण दुसरे

श्रीमती प्रेमलाताई चव्हाण–जीवनपरिचय

प्रकरण दुसरे

श्रीमती प्रेमलाताई चव्हाण–जीवनपरिचय

जीवनपरिचय :

केंद्रियमंत्री ना. आनंदराव चव्हाण यांच्या सुविद्य पत्नी खा. प्रेमलाताई चव्हाण या पतीनिधनानंतर १९७३ साली कराड लोकसभा मतदार संघातून बिनविरोध लोकसभेवर निवडून आल्या. ''कॉंग्रेसमध्ये पुरूष उमेदवारांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागी पत्नीला किंवा त्यांच्या परिवारातील निकटच्या नातेवाईक महिलेला पोटनिवडणूकीत निवडून आणल्याची उदाहरणे आहेत.''[१] यामध्ये महाराष्ट्रात स.गो.बर्वे यांच्या आकस्मिक निधनानंतर त्यांची बहिण ताराबाई सप्रे यांना कॉंग्रेस पक्षाने खासदार होण्याची संधी दिली. ''त्यानंतर कॉंग्रेसमधील एखादा उमेदवार लोकसभा मतदारसंघातून चार वेळा निवडणूक जिंकली असेल तर अशा उमेदवारांच्या परिवारातील महिलांनाही खासदार होण्याची संधी दिली जात असे. त्याप्रमाणे केंद्रियमंत्री आनंदराव चव्हाण यांनी १९५२, १९६२, १९६७, १९७१ च्या लोकसभा निवडणुका कराड लोकसभा मतदार संघातून बहुमताने लढविल्या व जिंकल्या ना. आनंदराव काका हे कॉंग्रेसनिष्ठ होते. १९७३ नंतर कॉंग्रेसपक्षाने श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांना लोकसभेत संधी दिली.''[२] श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांच्यावर आपल्या पतींच्या विचारांची छाप होती. कदाचित त्यामुळेच ''१९७३ च्या लोकसभा पोटनिवडणूकीत त्या बिनविरोध लोकसभेवर खासदार म्हणून गेल्या.''[३]

कै. ना. आनंदरावकाका आपल्या राजकीय जीवनात कॉंग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहिले. आपल्या राजकीय नेतृत्वाशी एकनिष्ठ राहिले. ना. आनंदराव काका तत्कालीन भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू यांचा आदर करत होते. कै. ना. आनंदराव

काका यांनी १९६० मध्ये काँग्रेस प्रवेश केला. त्यांनी पंडित ज़वाहरलाल नेहरू , लालबहादूर शास्त्री, श्रीमती इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात विविध पदे उपभोगली. १९७१ च्या लोकसभा निवडणूकीनंतर ते कायदा व कंपनी खात्याचे राज्यमंत्री म्हणून कार्यरत होते.

कै.ना.आनंदराव काका यांची कॉग्रेसनिष्ठ विचाराची धुरा प्रेमलाताईनी पुढे चालवली. आनंदरावकाकांना राजकीय जीवनात श्रीमती प्रेमलाताई यांनी सहकार्य केले. महाराष्ट्रात श्रीमती प्रेमलाताई यांना 'काकी' या नावाने ओळखतात. ते त्यांचे सामाजिक, राजकीय कार्य बहुमोलाचे होते म्हणूनच हा बहुमान त्यांना महाराष्ट्राकडून मिळाला आहे. श्रीमती प्रेमलाकाकी यांच्यातून प.महाराष्ट्रातील एक महिला नेतृत्व पुढे आले. प्रेमलाकाकींना राजकीय पार्श्वभूमी केंद्रियमंत्री आनंदरावकाकांची होती. असे असले तरी मुळात नेतृत्व करण्याचे गुण त्यांच्यात होते. भावी राजकीय आयुष्यात त्यांनी सामाजिक कार्य तर केलेच आणि राजकीय यश ही मिळविले. ''१९७३, १९७७, १९८४, १९९१ अशा लोकसभा निवडणूका त्यांनी स्वबळावर, स्वत:च्या कार्यकतृत्वावर लढविल्या.''[४] महाराष्ट्राचे नेतृत्व त्यांनी लोकसभेत केले. ज्या काळात महिला पुढे येत नसत त्या काळात त्यांनी महिला नेतृत्व पुढे आणले. आजच्या महिलांना आणि महिला नेतृत्वाला प्रेमलाकाकींचे नेतृत्व एक आदर्शवत आणि मार्गदर्शक आहे. अशा आदर्श महिला नेतृत्वाचा व्यक्तिपरिचय करून घेणे आवश्यक आहे.

जन्म, बालपण, शिक्षण, विवाह :

''खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांचा जन्म २जुलै १९१८ रोजी बडोदा(गुजरात) येथे झाला.''[५] त्यांचे मुळ घराणे कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ हे आहे.

प्रकरण दुसरे

बडोदा शहराचा इतिहास :

श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांचे जन्मगाव असलेले बडोदा हे गुजरातमधील एक ऐतिहासिक शहर आहे. बडोदा शहर पूर्वी एक लहानसे खेडे होते. ''इ.स. ८१२ च्या दरम्यानचा इतिहास असा आहे की, पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी हे गाव व जमीन सत्पात्री दान दिले होते. इ.स.८१२-८२१ मध्ये राष्ट्रकुट घराण्यातील राजा कर्कराज याचा अंमल गुजरातवर होता. त्याने शके ७३४ मध्ये ताम्रपट केले. वटपद्रक आत्ताचे बडोदा हे गाव एका ब्राह्मणास दान दिले. कर्कराज राजा मेरूतुंगाचार्य यांच्या प्रबंध चितांमणीतील सिध्दराजाच्या भीतीने खंबायतेहून भडोचकडे पलायन करत होते. तेव्हा वटपद्रपूर गावी आले. वटपद्रक म्हणजे बडोदा असे नाव पडले.''[६]

पूर्व इतिहास पहाता बडोदा शहर प्राचीन काळापासून वसलेले आहे असे दिसते. वटपद्रक म्हणजेच बडोदा हे शहर जम्बुवाटिका गावाच्या पूर्वेस अंकोटक गावाच्या पश्चिमेस व वादयच्छगावाच्या उत्तरेस वसलेले आहे. वटपद्रग्राम हे होते. पुढे खेड्याचा विस्तार झाला. त्याला वटपद्रपूर असे नाव पडले. त्यानंतर ''१३व्या शतकात वटपद्रपुरास व्यापाराच्या निमित्ताने बरीच प्रसिध्दी मिळाली. त्यामुळे या गावाचे नाव 'वीरक्षेत्र' झाले. त्यानंतर वीरक्षेत्राचे 'वटोदर' असे नाव पडले. त्याचाच अपभ्रंश गुजरातीमध्ये वडोदरा मराठीमध्ये बडोदा, इंग्रजीमध्ये बरोडा असे झाले.''[७]

बडोदा संबंधीचा सोळाव्या शतकातील असा इतिहास आहे. दिल्ली राज्यात अफगाण राज्याचे राज्य होते. सत्ता कमकुवत झाल्याने या राज्यातील सुभे स्वतंत्र झाले. त्यापैकीच गुजरातचा सुभेदार स्वतंत्र झाला. त्याने स्वतंत्र होऊन आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले. त्यावेळी गुजरात प्रांताची राजधानी अहमदाबाद येथे वसवलेली होती. या दरम्यान दिल्ली प्रांतात मोगलांची सत्ता स्थापन झाली. अकबर बादशहाने गुजरात प्रांत जिंकला. अर्थात बडोदावरील सत्ता मोगल बादशहाकडे गेली. अकबर बादशहाने गुजरातची सत्ता घेतली. बडोदा येथील कारभार

पाहण्यासाठी अकबर बादशहाने आपला सरदार कुतूबुध्दीन महंमद याची नियुक्ती केली कुतुबुध्दीन महंमद याचा वध झाला आणि मोगलाची सत्ता गेली. ''मोगलानंतर गुजरातवर बाबी वंशाच्या मुस्लीम राजांची सत्ता आली. मराठ्यांनी या सत्तेचा पाडाव केला. त्यावेळी त्यांचे सेनापती दाभाडे यांची सत्ता गायकवाड यांच्याकडे आली. त्यावेळी गायकवाड घराण्याची गादी सुरक्षिततेच्या हेतूने खानदेशाच्या सरहद्दीवरील सोनगड किल्ल्यावर स्थापन करण्यात आली होती. पहिले सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या कारकीर्दीमध्ये ती बडोदा येथे आणली. मेरूतुंगाचार्य यांनी आपल्या 'प्रबंध चितांमणी' या ग्रंथात 'बडोदा' शहराचा इतिहास लिहिलेला आहे.''[८]

''बडोदा शहर बडोदा संस्थानची राजधानी होती. बडोदा विश्वामित्री नदीच्या पूर्व व दक्षिण किनाऱ्यावर वसले आहे. हे शहर मुंबईपासून दोनशे चव्वेचाळीस मैल दूर आहे. समुद्रसपाटीपासून बडोदयाची उंची एकशे तीस फूट आहे. या शहराचा एकूण विस्तार अकरा मैल आहे.''[९]

तत्कालीन भारतात पंचवीस संस्थाने होती. यातील बडोदा आणि इंदूर ही संस्थाने इतर संस्थानाच्या तुलनेत प्रगत आणि विकसित होती. बडोदा शहरात महाराज सयाजीराव गायकवाड यांचे राज्य होते. सयाजीराव गायकवाड यांनी अनेक आधुनिक, सुधारीत कार्यक्रम राबविले. त्याचप्रमाणे इंदूर याठिकाणी यशवंतराव होळकर, तुकोजी होळकर, आहिल्याबाई होळकर याचां वरदहस्त होता. त्यामुळे सामाजिक, राजकीय दृष्ट्या बडोदा संस्थानाप्रमाणे इंदूर संस्थानाचा ही विकास झाला. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांचा जन्म अशा प्रगतशील संस्थानात झाला.

''बडोदा येथे गणेशोत्सव, विजयादशमी असे मोठे सण साजरे केले जात असत. मैदानी आणि मर्दानी खेळ, हॉकी, फुटबॉल, क्रिकेट, सोंगट्या इ. प्रकारचे खेळ खेळले जात असत. बडोदा संस्थानामध्ये वाहतुकीसाठी टॅक्सी, मोटर, घोडागाडी ही साधने होती. बडोदा संस्थानातील सर्व प्राथमिक, माध्यमिक

शिक्षणसंस्था मुंबई विद्यापीठास संलग्न केलेल्या होत्या.''[१०] बड़ोदा संस्थानामध्ये काही खाजगी आणि काही सरकारी शिक्षणसंस्था होत्या. अशा प्रकारे तत्कालीन भारतातील बडोदा हे विकसीत संस्थान होते.

श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांचा जन्म, बालपण महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या पुण्यनगरीत झाले. इंदूर संस्थानचे सरदार माधवराव नारायणराव जगदाळे हे श्रीमती काकींचे वडील होत. जगदाळे कुटूंबात माधवराव जगदाळे हे एकमेव सदस्य सुशिक्षित होते. ''सरदार माधवराव जगदाळे यांचे मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळमध्ये झाले. त्यांचा स्वभाव शिस्तबध्द आणि कडक होता. श्रीमती प्रेमलाताई यांच्या मातोश्री ताराबाई या राजघराण्यातील होत्या. ताराबाई या महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या साडूची कन्या होत. या दोन्ही कारणांमुळे माधवराव जगदाळे प्रथम बडोदा येथे सयाजीराव गायकवाड यांच्या सेवेत एडीसी म्हणून कार्यरत होते.''[११] महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या सेवेत माधवराव जगदाळे यांनी प्रशासकीय कार्य उत्तम केले. याच दरम्यान इंदूर संस्थानामध्ये प्रिन्स यशवंतराव महाराज गादीवर आले. जगदाळे घराण्याचा प्रामाणिकपणा, एकनिष्ठता यशवंतराव महाराजांना माहित होता. त्यांनी स्वत: बडोदा येथे जावून माधवराव जगदाळे यांना इंदूरमध्ये आणले. इंदूर संस्थानामध्ये प्रिन्स यशवंतराव यांच्या सेवेत सरदार म्हणून कार्यरत झाले. याचवेळी सरदार माधवराव जगदाळे सहकुटूंब आहिल्याबाई होळकर यांच्या नगरीत स्थायिक झाले. श्रीमती प्रेमलाताई यांना अल्पकाळ मातृछाया मिळाली. लहान असतानाच ताराबाई जगदाळे यांचे निधन झाले. परंतु वडिलांनी ही कमतरता कधीही जाणवू दिली नाही. श्रीमती प्रेमलाताई यांचे वडिल सरदार माधवराव जगदाळे हे प्रथम बडोदा व नंतर इंदूर संस्थानामध्ये कार्यरत होते. थोडक्यात श्रीमती प्रेमलाताईना माहेरहून राजकीय वारसा लाभला आणि सासरी आपल्या पतीच्या सहवासाने तो मिळाला.

"माधवराव जगदाळे कुटूंब

↓

माधवराव जगदाळे–ताराबाई जगदाळे

↓ ↓ ↓

प्रेमलाताई मदन कलावती "

माधवराव जगदाळे आणि ताराबाई यांना तीन अपत्ये होती. श्रीमती प्रेमलाताई या भावडांत मोठ्या होत्या. त्यांना घरी 'अक्का' असे म्हणत असत. "मदन जगदाळे हे त्यांचे भाऊ आर्मीत मेजर होते. मेजर एम.एम. जगदाळे म्हणून ते प्रसिध्द होते."[१३] त्यांची लहान बहिण कलावती यांना घरी 'बेबी' असे म्हणत असत. त्यांची बहिण कलावती या कोल्हापूरचे निंबाळकर व जागतिक पातळीवरचे क्रिकेटर भाऊसाहेब निंबाळकर यांच्या सुविद्य पत्नी होत.

श्रीमती प्रेमलाताई कुटूंबात मोठया असल्याने भावडांची सर्वस्वी जबाबदारी त्यांच्यावर होती. कारण मातोश्री ताराबाई यांचा प्रेमलाताई लहान असतानाच देहांत झाला होता. त्यामुळे कोणतीही जबाबदारी पेलण्याची क्षमता त्यांच्यात लहानपणापासूनच आली होती.

शैक्षणिक वाटचाल :

श्रीमती प्रेमलाताई यांचे वडिल प्रथम बडोदा संस्थानामध्ये सयाजीराव महाराजांच्या सेवेत होते. यामुळे "प्रेमलाताईंचे प्राथमिक शिक्षण बडोदा येथे 'दि महाराणी चिमणाबाई हायस्कूल' या ठिकाणी झाले."[१४] या हायस्कूलचे वैशिष्टय असे की येथे शिक्षणाचे माध्यम इंग्रजी होते. तसेच या हायस्कूलमध्ये महाराष्ट्रीयन विद्यार्थी शिकत असत. श्रीमती प्रेमलाकाकींच्या वेळी चिमणाबाई हायस्कूल मध्ये ४ मराठी मुली होत्या. एक निर्मलाराजे गायकवाड या नंतर अक्कलकोटच्या राणी झाल्या. दुसऱ्या निर्मलाराजे भोसले या महाराष्ट्रात शिक्षणमंत्री झाल्या. तिसऱ्या मालतीबाई शिरोळे यांनी पुणे मॅट्रीक केल्यानंतर मेडिकल कॉलेजला प्रवेश घेतला व डॉक्टर

झाल्या. चौथ्या प्रेमलाकाकी यांनी भारतीय लोकसभेत व राज्यसभेत महाराष्ट्राचे नेतृत्व केले. महाराष्ट्रातील एक करारी महिला नेतृत्व म्हणून देशात पुढे आल्या. श्रीमती प्रेमलाकाकी यांनी माध्यमिक शिक्षण एस्.एन्. डी.टी. महाविदयालय येथून घेतले. माध्यमिक शिक्षणानंतर उच्च शिक्षणासाठी त्यांना बाहेर जावे लागणार होते. पूर्वी आपल्या समाजात पडदा पध्दत होती. मराठ्यांच्या मुलीना घराबाहेर जाण्यास बंधने होती.

''माध्यमिक शिक्षण घेत असताना त्यांना व त्यांची बहिण कलावती यांना शिकविण्यासाठी मार्शल आणि डिसुजा हे शिक्षक घरी येत असत.''[१५] मॅट्रीकची परिक्षा प्रेमलाताई यांनी उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण केली. श्रीमती प्रेमलाकाकींना शिक्षणाची आवड होती. पुढे शिकण्याची इच्छा होती परंतु वडिलांचा कडक स्वभाव, शिस्तबद्ध राहणी आणि पडदा पध्दत यामुळे उच्च शिक्षण घेण्यासाठी अडचणी आल्या. ''घराबाहेर जावून मुलींनी शिक्षण घेणे या संकल्पनेला वडिलांचा विरोध होता.''[१६] मॅट्रीकपर्यंतचे काकींचे शिक्षण बडोदा येथे झाले. त्यानंतर जगदाळे कुटूंब इंदूरला आले. काकींच्या मॅट्रीकनंतरच्या शिक्षणासाठी विरोध होता. परंतू प्रेमलाताईना शिक्षणाची आवड होती. सतत वाचन करणे, विविध परिक्षांना बसणे, नवीन काहीतरी शिकणे आणि शिकविण्याचा त्यांचा छंद होता. ''श्रीमती इंदिराबाई भागवत ही त्यांची मावस बहिण इंदूर संस्थानामध्ये शिक्षणमंत्री होत्या. मुलीने शिकले पाहिजे. पुढे आले पाहिजे असे त्यांना वाटत होते. प्रेमलाताईचा शिक्षणातील उत्साह पाहून काकांचा विरोध विचारात न घेता मी या मुलीला शिकवणारच या हट्टासाने त्यांनी मदत केली. मॅट्रीकनंतर प्रेमलाताई यांनी सिनियर केंब्रिजची पदवी घेतली इंदिराबाई भागवत यांनी सिनियर केंब्रिजची परिक्षा ताईना घरी बसून देता यावी अशी व्यवस्था केली होती.''[१७] त्याप्रमाणे सिनियर केंब्रिजचे पेपर घरी आले होते. १९४० साली प्रेमलाकाकी सिनियर केंब्रिज उत्तीर्ण झाल्या.

विवाहानंतर प्रेमलाकाकी काही दिवस आनंदरावकाकांच्या समवेत इंदूरला होत्या. तेंव्हा त्यांनी मॉन्टेसरीचा डिप्लोमा शारदा आश्रम, मुंबई याठिकाणी केला. यासाठी त्या शारदा आश्रमात सहा महिने राहिलेल्या होत्या. निरूपमा आणि पृथ्वीराज ही अपत्ये झाल्यानंतर त्यांनी हा डिप्लोमा केला. ''डिप्लोमा झाल्यानंतर त्या प्रत्येक रविवारी बोस्टन आश्रमात येऊन विदयार्थींनीला प्रात्यक्षिक देत असत.''[१८]

श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांच्या माहेरचे वातावरण राजेशाही पध्दतीचे होते.. वडिल माधवराव जगदाळे महाराज सयाजीराव गायकवाड आणि प्रिन्स यशवंतराव महाराज यांच्या सेवेत प्रशासकीय पदावर कार्यरत होते. त्याचबरोबर श्रीमती प्रेमलाताई यांच्या मातोश्री यांना ही राजघराण्याचा वारसा होता. यामुळे घरातील वातावरण संस्कारक्षम, शिस्तबध्द व राजेशाही थाटातील होते. विवाहकाळात प्रेमलाताईना श्रीमंत मुले आणि अनेक संस्थानातील राजपुत्र विवाहासंबंधात आलेली होती. प्रेमलाकाकीचे विवाहविषयक मत वेगळेच होते. श्रीमती प्रेमलाकाकी या सुशिक्षित होत्या. शिक्षणाचे महत्व त्यांना समजले होते. त्यामुळे ''त्या म्हणत की मला श्रीमंत किंवा कोणत्याही राजाशी लग्न करायचे नाही तर मला शिकलेल्या मुलाशीच लग्न करावयाचे आहे.''[१९] अशी त्यांची विवाहविषयक भूमिका होती. त्यांनी इतर आलेल्या स्थळांना त्यांनी नकार दिला.

''२५ एप्रिल १९४२ रोजी सोमवारी कोल्हापूर येथे ना. आनंदराव चव्हाण यांच्याशी प्रेमलाताईचा विवाह झाला.''[२०] योगायोग असा की प्रेमलाकाकी इंदूरमध्ये होत्या तेंव्हा म. गांधीजीची भेट सोमवारी झाली होती. तेंव्हापासून त्या प्रत्येक सोमवारी उपवास करत आणि मौनवृत्त धरत असत. त्यांनी १०वर्षे मौनवृत्त केले. योगायोगाने त्यांचा विवाह ही सोमवारीच झाला. त्यांच्या इच्छेप्रमाणे शिकलेल्या मुलाशी त्यांचा विवाह झाला. जणू मौनव्रताचे फलित त्यांना मिळाले.

''ना. आनंदरावकाका आणि प्रेमलाताई यांचा विवाह कोल्हापूर संस्थानच्या महाराणी ताराबाई यांनी आपल्या नवीन राजवाड्यावर करून दिला.''[२१] त्यावेळी आनंदराव चव्हाणसाहेब महाराणी ताराबाई यांचे सचिव म्हणून कार्यरत होते. ना. आनंदराव चव्हाण एम.ए.,एल्एल्.बी. होते. कायद्याचे सखोल ज्ञान होते. आनंदरावकाकांनाही सुशिक्षित, साक्षर मुलीशीच विवाह करावयाचा होता. दोहोंच्या इच्छेने आणि नेचकर यांच्या मध्यस्थीने हा विवाह संपन्न झाला.

''इंदूरसारख्या ठिकाणी राहिलेल्या प्रेमलाकाकी कराडहून टांग्यातून कुंभारगावला गेल्या. देवदर्शन घेतले. सासरी घोषा पध्दत होती. स्त्रियांनी घराबाहेर जायचे नाही अशी पध्दत होती. दोन दिवस काकी घराबाहेर पड़ल्या नाहीत. घरही साधे होते. त्या एका सामान्य शेतकऱ्यांची सून होत्या. असे असले तरी कुंभारगाव येथे आनंदराव काका यांच्या कुटूंबाला मानणारे लोक होते. तरीही काकींच्या जीवनात हा फार मोठा फरक होता.

१) स्वभावगुण :

श्रीमती प्रेमलाकाकींचा जन्म उच्च सरदारी थाट असलेल्या घराण्यात झाला. विवाहानंतर सासर राजेशाही थाटाचे मिळाले नाही. परंतु ना.आनंदराव काका हुशार, विद्वत्ताकुशल होते, केंद्रीयमंत्री होते. असे वातावरण त्यांना लाभले. असे असतानाही काकींच्या स्वभावामध्ये हळुवारपणा, प्रेमळपणा, निरागसता होती. दोन्ही घराण्याची राजकीय पार्श्वभूमी मोठी होती. आपल्यात आणि सामान्य जनतेत त्यांनी अंतर ठेवले नाही. ''त्यांना आपल्या शिक्षणाचा संपत्तीचा, सत्तेचा कधी गर्व वाटत नव्हता.''[२२] त्यांचा स्वभाव असा होता की त्या कोणालाही दुखावत नसत. कुटूंबातील प्रत्येकाची आणि बाहेरील व्यक्तींची ही वैयक्तिक विचारपूस करणे त्याला काय हवं-नको ते देणे हा काकींचा स्वभाव होता. यामुळे कुंटूंबातील प्रत्येक सदस्यांना प्रेमलाकाकी फार आवडत असत. सर्वांशी समजुन घेऊन बोलणे. ''त्यांचा अजून एक स्वभावगुण

असा होता की त्या कधीही कोणावरही रागवत नसत.''[२३] त्यांच्याकडे शांतता आणि सहनशीलता हे गुण होते. सहनशिलतेची शक्ती असल्यामुळे त्यांनी भावी आयुष्यात ही लोकप्रियता मिळविली, यशस्वी राजकीय वाटचाल केली.

विवाहानंतर जरी घरी घोषा पध्दत असली तरी त्या घरात स्वस्थ बसू शकल्या नाहीत. कारण सतत काहीतरी धडपड करणे, कामात व्यस्थ राहणे असा स्वभाव प्रेमलाकाकींचा होता. त्याचबरोबर नेतृत्व करण्याची क्षमता त्यांच्या अंगी होती. त्यामुळे सामाजिक कार्य करण्यास सुरूवात केली.

साधी कॉटनची साडी, जेवण साधे, घेत असत. त्यांना दररोजच्या जेवणात तुप आवडत असे. मासे ही त्यांना खुप आवडत असत. त्यांना स्वत:ची कामं स्वत: करायला आवडत असत. स्वत:च्या कपड्यापासून ते जेवण करण्यापर्यंत तसेच भाजी आणणे, बागकाम करणे, शिवणकाम करणे, वाचन, लेखन इ. कामे त्या स्वत: करत असत. अगदी त्या खासदार झाल्यानंतर आनंदाने ही कामे करत असत. स्वत: स्वयंपाक करून सर्वांना जेवू घालणे हे काम करायला त्यांना आनंद वाटत असे.

प्रेमलाकाकी खासदार झाल्यानंतर दिल्लीत होत्या. आपल्या लोकसभा मतदार संघातील, महाराष्ट्रातील असतील किंवा अन्य कोणीही व्यक्ती दिल्लीला आल्यानंतर प्रेमलाकाकींना भेटण्यासाठी हक्काने जात असत, प्रेमलाकाकी ही सर्वांची व्यवस्था आपल्या कुटुंबियासारखी करत असत. हे लोक भेटण्यासाठी आल्यानंतर त्यांना खूप आनंद होत असे. ''स्वत: जेवण करून स्वत: बरोबर जेवायला घालत असत. त्या स्वत: गाडीतून त्या व्यक्तिला संसद दाखवत असत. इंदिराजींना भेटवत असत.''[२४] यामध्ये त्यांना अभिमान वाटत होता. सर्वसामान्याशी त्या त्यांच्या कलाने बोलत असत. त्यांच्या समस्या काय आहेत त्या जाणून घेत. काकींच्या या स्वभावामुळे त्या सर्वसामान्यांना ही आपल्या वाटत होत्या.

कै.ना. आनंदराव चव्हाण केंद्रीयमंत्री झाले. तेव्हा आनंदरावकाका दिल्लीमध्ये गेले. त्यांच्याबरोबर प्रेमलाकाकी ही गेल्या. दिल्लीमध्ये काकींच्या सामाजिक कार्याला खरे व्यासपीठ मिळाले. सतत काही तरी करत रहाणे हा त्यांचा स्वभावगुण होता. त्यामुळे दिल्लीत त्यांनी किचन गार्डन सुरू केले. त्यांना बागकाम करणे आवडत असे. विविध प्रकारची फुले, फळे (फ्लॉवर, कोबी) त्यांच्या बागेत होती. ''किचन गार्डनच्या स्पर्धा होत असत. या स्पर्धेत त्यांचा पहिला नबर येत असे.''[२५] कराडलाही त्यांनी किचन गार्डन सुरू केले. स्पर्धा घेतल्या. यामध्ये एरम, जोशी, पुराणीक, जाधव इ. महिला सहभागी होत असत.

''प्रेमलाकाकी स्वभावाने अत्यंत कणखर होत्या.''[२६] आपल्या निर्णयावर त्या ठाम असत. राजकीय जीवनात त्यांनी तत्कालीन पंतप्रधान इंदिराजी यांना पक्षाच्या पडत्या काळात पाठींबा दिला. त्याचबरोबर त्या स्पष्ट वक्त्या होत्या. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. अंतुलेसाहेब सातारच्या दौऱ्यावर आले होते. बोलता-बोलता ते घसरले. ''यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे कंलंक आहेत. तेव्हा काकींनी त्यांना सांगितले की यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे कलंक नसून भूषण आहेत. आपण आपले विधान मागे घ्या, त्यावेळी यशवंतराव चव्हाण म्हणाले की, प्रेमलाकाकी या महाराष्ट्रात एकमेव पुरूष आहेत.''[२७] परिणामाची भीती त्यांना कधीही वाटत नसे जे आहे ते स्पष्ट बोलत असत. एवढेच नव्हे तर इंदिराजीशी ही त्या स्पष्ट बोलत असत.

२) धार्मिक वृत्ती :

श्रीमती प्रेमलाकाकी यांचा स्वभाव धार्मिक वृत्तीचा होता. सामाजिक कार्याची आवड होती. त्याचबरोबर त्या धार्मिक कार्ये ही करत असत. ''प्रेमलाताई चव्हाण यांनी वयाच्या १५व्या वर्षी संपूर्ण ज्ञानेश्वरी वाचन केले होते. प्रत्येक पौर्णिमेला त्या श्री सत्यनारायणाची पुजा घालत असत. स्वत: नऊवारी साडी नेसून पोती वाचन करत

असत. सोमवार, एकादशी, पौर्णिमा हे उपवास कडक धरत असत. उपवासादिवशी स्वत: स्वयंपाक करून सर्वांना जेवण घालत असत.''[२८] सोमवारी त्या मौन धरत असत. दररोज सकाळी उठल्यावर अंघोळ नंतर देवपूजा असा सकाळचा कार्यक्रम असे. महादेवाच्या त्या उपासक होत्या. गोकुळ अष्टमीसारखे सण ही त्या घरात पाळणा बांधून स्वत: कार्यक्रमाची तयारी करत असत. दररोज शिलामृत वाचन करत. इतर ग्रंथाचे वाचन करत असत. माळ जप करणे आणि शिवनाम नामस्मरण करणे हा त्यांचा नित्याचा क्रम होता. श्रीमती प्रेमलाकाकी बद्रीनारायण, गंगोत्री, वैष्णवीदेवी, कन्याकुमारी इ. अनेक तीर्थक्षेत्राना जावून आलेल्या आहेत.

३) शिक्षणविषयक मत :

विवाहानंतर ना.आनंदराव काका काही दिवस इंदूर येथे होते. १९५० नंतर त्यांनी कराड, सातारा, सांगली येथे वकीली सुरू केली. त्यामुळे प्रेमलाकाकी ही कराडमध्ये आल्या. प्रेमलाकाकींना आनंदरावसाहेबांचा पाठींबा होता. त्यामुळे त्या सामाजिक कार्य करू शकल्या. ''विवाहानंतर प्रथम कराडमध्ये पाटण कॉलनीत केशवराव पवार यांच्या माडीवर पहिली मॉन्टेसरी चालू केली.''[२९] ती मॉन्टेसरी त्या स्वत: चालवत असत. मॉन्टेसरीमध्ये १५ विद्यार्थी होते. ते सर्व विद्यार्थी आज उच्च पदावर आहेत.

त्यातील एक विद्यार्थी म्हणजे त्यांचे चिरंजीव खा.पृथ्वीराज चव्हाण हे होत. खा.पृथ्वीराज चव्हाण हे आज पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री आहेत.

विद्यार्थीदशेपासूनच श्रीमती प्रेमलाकाकी यांना देशसेवा, समाजसेवा, महिला कार्य व उन्नती करणे याची त्यांना आवड होती. ''१९४२ साली क्रांती चळवळ सुरू झाली होती. या काळात म. गांधीजींच्या सहवासाचा योग काकींना आला.''[३०] म. गांधीजीच्या प्रभावी व्यक्तिमत्वामुळे आणि त्यांच्या तत्वज्ञानाने काकींना सामाजिक व राजकीय कार्याची प्रेरणा मिळाली. ''इंदूरमध्ये त्यांचा प्रेमा कंटक यांच्याशी परिचय

झाला. दोघीमध्ये एवढा सहवास वाढला की राजकारण, असहकार आंदोलन यावर विचारमंथन होत असे.''[३१] यातूनच म. गांधी यांच्याशी पत्रव्यवहार सुरू झाला. विचाराला आचाराची जोड मिळाली. पाटण, सातारा, सांगली, शिराळा अशा विविध ठिकाणी काकींनी प्राथमिक, माध्यमिक शाळा सुरू केल्या. ग्रामीण भागातील प्रत्येक विदयार्थ्याला शिक्षण मिळाले पाहिजे तसेच मुलींना ही शिक्षण मिळाले पाहिजे या दृष्टीकोनातून त्यांचे सतत प्रयत्न करत असत. गावोगावी जाऊन, संधी मिळेल तेंव्हा ग्रामीण जनतेला शिक्षणाची जाणीव त्या करून देत असत.

४) आदर्श महिला नेतृत्व :

ज्या काळात महिला समाजात येणे अयोग्य मानले जात होते. 'चूल आणि मूल' हेच त्यांचे कार्यक्षेत्र होते अशा सामाजिक परिस्थितीत प. महाराष्ट्रातील एका शेतकरी कुंटुबातील सून श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांनी महिला नेतृत्व केले. प्रथम सामाजिक कार्यास सुरूवात केली. पती निधनानंतर राजकीय क्षेत्रात यशस्वी कार्य केले. इंदिरा कॉंग्रेसच्या एकनिष्ठ कार्यकर्त्या म्हणून देशात नाव कमवलं.

श्रीमती प्रेमलाकाकी यांना भारतीय समाजातील महिलांविषयी जाणीव होती. आपला देश पुरूष प्रधान आहे. तरीही महिला विकास, महिलांना आरक्षण यामध्ये आपला देश प्रयत्नशील आहे. भारतातील स्त्रिया सर्व क्षेत्रात अग्रेसर आहेत. शेतमजूर पासून पंतप्रधान पदापर्यंत त्यांनी जबाबदारी स्वीकारलेली आहे. थोडक्यात आज पुरूषांबरोबर स्त्रिया कोणतेही कार्य करू शकतात हे महिलांनी सिध्द केले आहे. ''प्रेमलाकाकी आपले महिलाविषयी मत सांगतात की, म. गांधीजी म्हणतात की, स्वातंत्र्य भीक मागून मिळत नाही त्यासाठी संघर्ष करावा लागतो. त्याप्रमाणे महिलांना स्वतंत्र करावयाचे असेल तर संघर्ष करावा लागेल.''[३२]

वैदिक काळात स्त्रियांचे स्थान उच्च होते. या काळात गार्गी, मैत्रीयी, सारख्या विद्वान महिला भारतात झाल्या. पौराणिक काळात ही सिता, द्रौपदी,

15874

तारामतीसारख्या महिला होऊन गेल्या. त्यानंतर भारतावर विदेशी लोकांचा अंमल आला आणि भारतीय महिलांवर बंधने आली. भारतातील पडदा पध्दत हे त्यांचेच द्योतक आहे.

''स्वातंत्र्यानंतर म.गांधी, लोकमान्य टिळक, म.फुले, राजा राममोहन रॉय या भारतीय नेत्यांनी महिला स्त्री मुक्तीसाठी प्रयत्न केले.''[३३]

राजीव गांधी यांनी महिला वर्षात महिलांसाठी स्वतंत्र मंत्रालय निर्मितीसाठी प्रयत्न केले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २० कलमी कार्यक्रम आयोजित केला. ''हा कार्यक्रम महिलासाठी उपयुक्त आहे. परंतु हा कार्यक्रम ग्रामीण महिलापर्यंत पोहचला पाहिजे. ग्रामीण महिलापासून तीची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे. पुरूषांबरोबर तिला समान वेतन मिळाले पाहिले. अशी मागणी लोकसभेत प्रेमलाकाकी यांनी केली.''[३४] भारतीय स्त्रियांची आजची स्थिती काय आहे. त्यांच्या समस्या काय आहेत. यासंबंधी त्या लोकसभेत बोलत असत. महिलांना शिक्षण मिळाले तरच त्यांचा विकास होईल. यासाठी त्यांनी लोकसभेत ही महिला शिक्षणविषयक मत मांडले.

''ज्या देशातील स्त्रिया सुधारलेल्या असतात. त्या देशाची उन्नती व्हायला वेळ लागत नाही.''[३५] हे स्टॅलिनचे विचार समोर ठेवले आणि महिलांच्या उन्नतीसाठी त्यांनी कार्य केले. अहिल्याबाई होळकर यांच्या नगरीत काकींनी शिक्षण घेतले. त्यांच्या कार्याच्या प्रेरणेने प्रेमलाताई यांनी सर्व क्षेत्रात २० कलमी कार्यक्रमांची अंमलबजावणी केली. ''स्वराज्याच्या गेल्या ३२ वर्षात खऱ्या अर्थाने हे न्यायदानाचे काम करण्याचा प्रयत्न नेतृत्वाने केला आहे.''[३६]

भारतीय महिलांचे शिक्षण, त्यातील समस्या आणि आपण हे प्रमाण वाढविण्यासाठी काय करू शकतो याचे विवेचन लोकसभेत केले. ''महिलांना मोफत शिक्षण या धोरणाची अंमलबजावणी झाली पाहिजे. त्यासाठी सरकारने अनुदान दिले

पाहिजे.''[३७] अशा स्वरूपाच्या मागण्या त्यांनी लोकसभेत केल्या. ग्रामीण भागातील लोक गरीब आहेत. त्यामुळे ते मुलांना शिक्षण देवू शकत नाहीत. त्यांच्यासाठी सरकारने विविध सुधारणा कराव्यात. उच्च शिक्षण घेण्यासाठी बाहेरून आलेल्या मुलींसाठी राहण्याची सोय, त्यांच्या संरक्षणाची सोय करावी. औद्योगिक क्षेत्रात महिलांना राखीव जागा मिळाव्यात अशा स्वरूपाच्या मागण्या प्रेमलाकाकींच्या नेतृत्वाने लोकसभेत उतरल्या. याला प्रतिसाद ही मिळाला. त्यांनी महिला मजदूर यांच्यापासून औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचे प्रश्न जाणीवपूर्वक मांडले.

श्रीमती प्रेमलाकाकी यांनी केवळ सुधारणेचे विचारच लोकांपुढे ठेवले नाहीत तर त्या सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. कराड शहरात महिलांची पहिली मिटींग त्यांनी घेतली. कराड शहरात प्रथम बालवाडीची सुरूवात प्रेमलाकाकी यांनी केली. प्रेमलाकाकींना सामाजिक कार्याची आवड होती. त्यामुळे ''दिल्लीत हॉस्पिटल वेल्फेअर सोसायटीच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. त्या अखिल भारतीय महिला मंडळाच्या पदाधिकारी होत्या. अखिल भारतीय मुक व बधिर संस्थेच्या अध्यक्षा म्हणून काकी कार्यरत होत्या. इंटर नॅशनल फेडरेशन ऑफ बिझनेस अँड प्रोफेशनल संस्थेच्या उपाध्यक्षा म्हणून कार्यरत होत्या.''[३८] याचबरोबर ग्रामीण भागातील विदयार्थ्यांसाठी त्यांनी पाटण, कराड, सांगली या ठिकाणी प्राथमिक, माध्यमिक शाळा सुरू केल्या.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सातारा जिल्हयाने राज्यपातळीवर व देशपातळीवर नेतृत्व केले आहे. ते नेतृत्व देशाला आदर्श असे आहे.'' या नेतृत्वाची परंपरा श्रीमती प्रेमलाकाकी यांनी त्यांच्या राजकीय कारकीर्दीत समर्थपणे चालविले''[३९] श्रीमती प्रेमलाकाकी यांचे नेतृत्व सातारा जिल्हयाला आणि महाराष्ट्रातील नवनेतृत्वाला आदर्श, मार्गदर्शक आहे. सातारा जिल्हयातील एका शेतकरी कुटूंबातील सून,

बहुजन वर्गातील मुलाची पत्नी राज्यपातळीवर, देशपातळीवर नेतृत्व करते ही बाब महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे.

राजकीय वाटचाल :

श्रीमती प्रेमलाकाकी सरदार घराण्यातील होत्या. असे असले तरी विवाहपूर्व राजकीय कार्य करण्याचा योग त्यांना आला नाही. विवाहानंतर ना.कै. आनंदराव चव्हाण १९५०-१९६० या कालावधीमध्ये शेका पक्षामध्ये कार्यरत होते. १९६० मध्ये कॉंग्रेस प्रवेश केला. १९६० पासून १९७३ पर्यंत कॉंग्रेसनिष्ठ राहून पक्षकार्य केले. ना. आनंदराव चव्हाण यांनी पंडित नेहरू, लाल बहादूर शास्त्री, श्रीमती इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात कार्य केले. श्रीमती प्रेमलाताई यांनी श्रीमती इंदिराजी आणि ना. आनंदराव साहेबांचे नेतृत्व जवळून पाहिले होते.

ना.कै.आनंदराव चव्हाण यांनी १९५७, १९६२, १९६७, १९७१ अशा लोकसभा निवडणूका लढविल्या. ना. आनंदराव काकांच्या कार्यात प्रेमलाताईची ही प्रेरणा होती. आनंदराव काकांच्या निवडणूक प्रचार मोहिमेत प्रमुख प्रचारक श्रीमती प्रेमलाताई असत. कराड लोकसभा मतदारसंघामध्ये आनंदरावकाकांच्या अनुपस्थितीत प्रेमलाताई कार्यरत असत. महिलांना सामाजिक कार्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देत असत. आनंदरावकाकांच्या राजकीय काळापासून त्या गावोगावी जावून पक्षाचा, पक्षनेतृत्वाचा प्रचार करत असत. यातूनच त्यांचा राजकीय पाया घातला गेला. सामाजिक कार्याची पार्श्वभूमी अगोदरच तयार झाली होती. समाजात प्रेमलाकाकींच्या शब्दाला मान होता. श्रीमती प्रेमलाकाकी यांनी पती आनंदरावकाका यांच्या सामाजिक, राजकीय कार्यात मोलाची साथ दिली.

१९७३ मध्ये ना. आनंदराव चव्हाण यांचे अकाली निधन झाले. श्रीमती प्रेमलाताई यांनी पतिविरहाचे दु:ख आवरून इंदिराजींचे नेतृत्व स्विकारले. ''१९७३ मध्ये कराड लोकसभा मतदारसंघातून प्रेमलाताई पोटनिवडणूकीत बिनविरोध

कॉंग्रेसच्या खासदार म्हणून निवडून आल्या."[४०] खऱ्या अर्थाने प्रेमलाताई यांचा प्रत्यक्ष राजकीय सहभाग १९७३ पासून झाला. १९७३, नंतर १९७७, १९८४,१९८९ अशा निवडणुका लोकसभा मतदार संघातून लढविल्या. १९८९ पर्यंत त्या लोकसभेत महाराष्ट्राचे, कराड लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करत होत्या. १९८० मध्ये त्यांना राज्यसभेत नियुक्त करण्यात आले होते.

श्रीमती प्रेमलाताई यांचा व्यापक राष्ट्रहित हा राजकीय विचारसरणीचा पाया होता. श्रीमती प्रेमलाकाकी कॉंग्रेसनिष्ठ कार्यकर्त्या होत्या. राजकीय प्रारंभापासून त्या श्रीमती इंदिरा गांधी यांच्याशी एकनिष्ठ राहिल्या. पक्षाच्या अडचणीच्या काळात प्रेमलाकाकी इंदिरा गांधी यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्या. "९ जानेवारी १९७८ मध्ये इंदिरा कॉंग्रेसची स्थापना महाराष्ट्रात अगदी प्रतिकूल परिस्थितीत प्रेमलाताई यांनी केली."[४१] तत्कालीन भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पुरोगामी नेतृत्त्वाचा व विचाराचा पुरस्कार प्रेमलाताईनी केला. या तत्त्वानेच त्यांनी महाराष्ट्रात संघटनात्मक कार्य केले. संपूर्ण महाराष्ट्रात इंदिरा कॉंग्रेस पोहोचविली. इंदिरा कॉंग्रेसचे महत्त्व सांगितले. प्रेमलाताई यांनी महाराष्ट्रात नव नेतृत्वाची फळी निर्माण करून महाराष्ट्रातील इंदिरा कॉंग्रेस मजबूत केली.

श्रीमती प्रेमलाकाकी यांनी आपल्या राजकीय काळात पक्षाचे अविरत कार्य केले. परंतु पक्षाकडून किंवा पक्षनेतृत्त्वाकडून कोणत्याही सत्तापदाची किंवा मंत्रीपदाची त्यांनी अपेक्षा ठेवली नाही. ज्या समस्या निर्माण झाल्या त्या सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. समाजहितासाठी त्यांनी ज्या मागण्या केल्या त्यांच्या पुर्ततेसाठी हट्ट धरला. राजकीय क्षेत्रात श्रीमती प्रेमलाकाकीसारखे निर्लोभी व्यक्तिमत्त्व दुर्मिळच वाटते.

खा. श्रीमती प्रेमलाताई यांनी कॉंग्रेसमधील अनेक समित्यांचे अध्यक्षपद भूषविले. त्याचबरोबर त्यांनी लोकसभेतील महत्त्वपूर्ण समित्यांवर ही कार्य केले.

अखिल भारतीय महिला विभाग, अखिल भारतीय महिला क्रिकेट संघटना, नॅशनल कॅंपेन कमिटी, आंतरराष्ट्रीय महिला कामगार समिती अखिल भारतीय मुक व बधिर संस्था, महाराष्ट्र महिला हॅण्डबॉल संघटनेच्या अध्यक्षा, भारतीय महिला मंडळ इ. समित्यांच्या त्या अध्यक्षा होत्या. श्रीमती प्रेमलाताई यांनी आपल्या राजकीय वाटचालीमध्ये यशस्वी कार्ये केली. ''१९७८ आणि १९८० मध्ये त्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा झाल्या.''[४२] महाराष्ट्र विकासासाठी त्यांनी लोकसभेत अनेक मागण्या केल्या, कराड लोकसभा मतदार संघाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रयत्न केले. स्थानिक विरोधामुळे प्रेमलाताई कराड लोकसभा मतदारसंघात अधिक विकासकामे करू शकल्या नाहीत. त्यांनी अस्तित्त्वात असलेल्या सहकारी संस्थाना, समाजहित साधणाऱ्या संस्थांना मदत केली. अनेक शिक्षण संस्थाना अनुदान मिळवून दिले.

त्यांनी स्वत: सहकारी संस्था स्थापन केल्या नाहीत. खा. श्रीमती प्रेमलाकाकी यांनी गटबाजीचे राजकारण कधीही केले नाही. समाजहितासाठी जे लोक पुढे येतील त्यांना प्रेमलाकाकींनी मदत केली. मग तो आपल्या पक्षाचा असो अथवा विरोधी पक्षाचा असो. जनहिताचा हेतू साध्य करणे हा त्यांचा उद्देश होता.

उच्च विचारसरणी आणि समाजाचा सर्वांगीण विकास ही विचारधारा प्रेमलाताईची होती. यामुळे प्रेमलाताई यांनी राजकीय, सामाजिक कार्यात कधीही आपला स्वार्थ पाहिला नाही. प्रेमलाताईनी आपल्या कामाचे स्वरूप नेहमी व्यापक ठेवले. १९७३-८९ पर्यंत प्रेमलाताई यांनी श्रीमती इंदिराजी व राजीव गांधी यांना प्रत्यक्ष राजकीय पाठींबा दिला. त्यानंतर २००३ पर्यंत त्यांनी काँग्रेस पक्षाला मार्गदर्शन केले. श्रीमती प्रेमलाताईची काँग्रेसनिष्ठा अखेरपर्यंत होती.

प्रकरण दुसरे

श्रीमती इंदिरा गांधी आणि श्रीमती प्रेमलाताई– स्नेहसंबंध :

ना. कै. आनंदराव चव्हाण केंद्रियमंत्री असताना प्रेमलाताई त्यांच्या सोबत दिल्लीत रहात असत. तेंव्हापासून श्रीमती इंदिराजी व श्रीमती प्रेमलाताई यांच्यात स्नेहसंबंध होते. श्रीमती प्रेमलाताई खासदार झाल्यानंतर या स्नेहसंबंधात वृद्धी झाली. खा. श्रीमती प्रेमलाताई श्रीमती इंदिराजीना आपल्या राजकीय जीवनातील आदर्श नेतृत्त्व मानत असत. ''या राजकीय नेतृत्वातील स्नेह केवळ भावनिक पातळीवर नव्हता तर श्रीमती इंदिरा गांधी यांचा सहवास प्रेमलाकाकी यांच्या बहुआयामी व्यक्तीमत्त्वाला तात्वीक आधार देणार होता.''[४३]

प्रेमलाताई आणि इंदिराजी यांच्या मैत्रीसंबंधात प्रेमलाकाकींचे अनेक पुरस्कर्ते पुरावे देतात. ते असे –

१९८४ मध्ये काही कॉंग्रेस कार्यकर्ते एशियाड ८२ चे महाराष्ट्र व गुजरातचे हक्क तसेच फिल्मस डिव्हीजन निर्मित पु.ल.चित्रपटांचे वितरण व टी.व्ही. राईटस् मिळाले होते. यासंदर्भात शासनाकडून करमुक्ती मिळवण्याचा प्रयत्न होता. यामध्ये प्रेमलाताईच त्यांना मदत करू शकत होत्या. एशियाड ८२ चे संयोजन हे श्रीमती इंदिराजीच्या क्रिडाप्रेमाचे प्रतिक होते. भारतात एशियाडची सुरूवात पंडित नेहरू यांनी केली होती. म्हणून हा चित्रपट पंडित नेहरूच्या स्मृतींना अर्पण करावयाचा होता. या सर्व कल्पनेत प्रेमलाताईनी त्यांना मदत केली. ८ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिराजी नागपूरला जाण्यासाठी सहारा विमानतळ मुंबई येथे आल्या. प्रेमलाकाकींनी एशियाड ८२ चा प्रस्ताव इंदिराजीकडे दिला. त्यांनी इंदिराजीना विषय समजून सांगितला. इंदिराजीनी प्रेमलाकाकींना पटकन सांगितले की या कार्यात माझे पूर्ण सहकार्य मिळेल. दोहोत एकमेकीबद्दल आदर व प्रेम होते.

तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी आणि श्रीमती प्रेमलाकाकी यांच्या मैत्रीला राजकारणाचे बंधन नव्हते. ''दोहोतील मैत्रीला स्वार्थाचा आणि मी पणाचा गर्व

नव्हता. परस्परांना सुखदु:खाच्या प्रसंगी साथ देणे एकमेकींना कटूसत्य देखील सांगण्याची क्षमता होती.''[४४] त्यामुळे दोहोतील मैत्री अखेरपर्यंत दृढ राहिली.

सामाजिक कार्य :

खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांचा राजकीय कार्याबरोबरच सामाजिक कार्याचा आलेखही मोठा आहे. विवाहानंतरही त्यांनी सामाजिक कार्य केले. १९७३-९१ पर्यंत त्या राजकीय क्षेत्रात होत्या. आपल्या अधिकाराच्या कक्षेत त्यांनी सामाजिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. सामान्यातील सामान्य जनतेचे प्रश्न त्यांनी आपलेपणाने जाणून घेतले. त्यामुळे प्रेमलाताई सामान्य व्यक्तीलाही कधी परक्या वाटत नसत. हक्काने कोणतीही गोष्ट त्या व्यक्ति प्रेमलाकाकींना सांगत असत. ऐवढा लोकांच्यात प्रेमलाकाकींबाबत विश्वास निर्माण झालेला होता.

''श्रीमती प्रेमलाताई यांनी अनेक ठिकाणी रस्ते, दुर्गम भागातील लोकांसाठी पाणी पुरवठा, पाझर तलावांसाठी प्रयत्न, लघुसिंचन योजना, ग्रामीण भागात विद्युतीकरण, प्राथमिक, माध्यमिक शाळेस मंजूरी, डोंगरीविकास निधीची स्थापना, पुरग्रस्त व्यक्तींना मदत, धरणग्रस्तांचे पुनर्वसन, कुटीर उद्योगांची निर्मिती, महिलांसाठी शिक्षण व विविध ठिकाणी शिक्षणसंस्थांची निर्मिती, महिलांसाठी विशेष सोयी-सुविधा, ग्रामीण भागात महिला मंडळाची स्थापना, कामगार वर्गासाठी सोयीसुविधा, २० कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी, स्वातंत्र्यसैनिकांसाठी कार्य इ. स्वरूपाचे त्यांनी सामाजिक कार्याचे योगदान दिले.''[४५]

अंतकाल :

श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांनी १९५० पासून ना.कै. आनंदराव चव्हाण यांच्या राजकीय, सामाजिक, कौटुंबिक कार्यात साथ दिली. १९७३ साली पतीनिधनानंतर त्यांच्या विचाराची धुरा अविरत चालवली. त्यांनी एकनिष्ठेने पक्षकार्य,

राजकीय, सामाजिक कार्य केले. १९९१ साली आपल्या विचाराची धुरा सुपूत्र खा. श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याा हाती दिली. "८ जुलै, २००३ रोजी खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांचे निधन झाले."[४६] आजही महाराष्ट्रातील चव्हाण घराणं काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ आहे. कै.ना. आनंदरावसाहेब आणि खा.श्रीमती प्रेमलाताई चव्हाण सध्या खा. श्री.पृथ्वीराज चव्हाण असे कर्तृत्त्ववान, आदर्श नेतृत्त्व चव्हाण कुटूंबाने महाराष्ट्राला, देशाला दिले आहे.

खा. श्रीमती प्रेमलाताई दाजीसाहेब चव्हाण यांच्या राजकीय कार्याचा सविस्तर आढावा आपण पुढील प्रकरणात घेणार आहोत.

प्रकरण दुसरे

संदर्भ ग्रंथ

१) फडके, य.दि. : लोकसभा निवडणुका, पृ.६५.

२) कित्ता,

३) दैनिक ऐक्य, : पृ. २.

४) सौ.चव्हाण सत्त्वशील : मुलाखत, दि.१२ एप्रिल, २००७.

५) दैनिक पुढारी, : १९७३, पृ.१.

६) गर्गे, स.मा. : करवीर रियासत, गो. य. प्रकाशन, दुसरी आवृत्ती, १९८०, पृ.

७) कित्ता,

८) कित्ता, पृ. १६७.

९) कित्ता, पृ. १६८.

१०) कित्ता,

११) दैनिक ऐक्य, : १९७४, पृ. २.

१२) सौ. निंबाळकर कलावती : मुलाखत, दि. नोव्हेंबर, २००७.

१३) कित्ता,

१४) श्री.धरमसी, खिरीश : दैनिक ऐक्य, पृ. २.

१५) सौ.निंबाळकर कलावती : मुलाखत, दि. नोव्हेंबर, २००७.

<u>प्रकरण दुसरे</u>

१६) कित्ता,

१७) कित्ता,

१८) किरपेकर, उदय : दैनिक पुढारी.

१९) सौ.निंबाळकर, कलावती : मुलाखत, दि. नोव्हेंबर, २००७.

२०) श्री.चव्हाण पंजाबराव : मुलाखत, दि. ऑगस्ट, २००७.

२१) श्री.चव्हाण राजकुँवर : मुलाखत, दि. २५ मार्च , २००८.

२२) श्री. पाटील आनंदराव : मुलाखत, दि. ऑक्टोबर, २००७.

२३) श्री.चव्हाण पंजाबराव : मुलाखत, दि. ऑगस्ट, २००७.

२४) श्री.चव्हाण राजकुँवर : मुलाखत, दि. २५ मार्च , २००८.

२५) कित्ता,

२६) श्री.पाटील आनंदराव : मुलाखत, दि. नोव्हेंबर, २००७.

२७) श्री.चव्हाण पंजाबराव : मुलाखत, दि. २३ ऑगस्ट, २००७.

२८) श्री.चव्हाण राजकुँवर : मुलाखत, दि. २५ मार्च , २००८.

२९) दैनिक ऐक्य, : १९७३.

३०) रामप्रताप साप्ताहिक.

३१) श्री.धरमसी खिरीश, : दैनिक ऐक्य.

३२) श्रीमती चव्हाण : लोकसभा, डिबेट, १९८५.
प्रेमलाताईंचे विवेचन

३३) कित्ता,

३४) कित्ता,

३५) रामप्रताप साप्ताहिक, : १९७४.

३६) पाटील जगन्नाथ : लोटांगण, वृत्तपत्र, १९८५.

३७) लोकसभा डिबेट, : २७ मे, १९७८.

३८) श्री. धरमसी खिरीश : दैनिक पुढारी, २३ जुलै,२००३.

३९) पाटील, एच्.पी. : रामप्रताप साप्ताहिक, ७ डिसेंबर, १९८०.

४०) मा.ना.श्री. चव्हाण पृथ्वीराज : ~~मुखाखत~~. मुलाखत

४१) दै. तरूण भारत, : २००३, पृ. ३.

४२) श्री. आवळकर गजानन : मुलाखत, दि.२० ऑक्टोबर,२००७.

४३) श्री. पाटील, आनंदराव : मुलाखत, दि.११ आक्टोबर, २००७.

४४) श्री. धरमसी खिरीश : दैनिक पुढारी.

४५) श्रीमती प्रभाराव : मुलाखत, दि.१ जानेवारी, २००८.

४६) श्री. चव्हाण, राहूल : मुलाखत, दि.२८ मार्च, २००८.

तत्कालीन केंद्रीय कायदा मंत्री कै. आनंदराव चव्हाण, खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण, विद्यमान पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री खा. श्री. पृथ्वीराज चव्हाण.

निरूपमा व विद्युलता या मुलींसमवेत ना. आनंदराव चव्हाण व खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण.